# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०१८–१९/20
दिनांक – 9 सप्टेंबर, २०१८

परिपत्रक :–

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र, इत्यादी महाविद्यालये (अल्पसंख्याक महाविद्यालयासह) आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक, रत्नागिरी उपकेंद्र व ठाणे उपकेंद्र यांना कळविण्यात येते की, सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग यांचे पत्र **क्र. सहसं/उशि/मुंवि/२०१८–१९/२१४५, दिनांक ३० ऑगस्ट,२०१८** अन्वये मुंबई विद्यापीठातील शिष्यवृत्ती धारकांची संख्या कमी असल्याबाबत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच शिष्यवृत्ती लाभधारक विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

उपरोक्त समस्येसाठी संहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग यांनी शिष्यवृत्ती समुपदेशन कक्ष, शिष्यवृत्ती सुविधा केंद्र बाबत पत्र **क्र. सहसं/उशि/मुंवि/२०१८–१९/२१४६, दिनांक ३० ऑगस्ट,२०१८** अन्वये मार्गदर्शन केलेले आहे. प्रत्येक महाविद्यालयात/विभागात शिष्यवृत्ती समुपदेशन कक्ष, शिष्यवृत्ती सुविधा केंद्र, सूचना फलक आदिबाबत सविस्तर माहिती दिलेली आहे. त्यानुसार उचित कार्यवाही करावी. तसेच उपरोक्त शिष्यवृत्ती संबंधी काही समस्या असल्यास नोडल ऑफिसर (श्रीमती माया महाडीक, मोबाईल नंबर ७७१८०५६५७५) यांच्याशी संपर्क साधावा.

तसेच, असेही नमूद करण्यात येते की, वर नमुद केलेल्या शासन पत्रामधील मजकुराचा काळजीपूर्वक अभ्यास करून संबंधित योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. वर नमुद केलेल्या पत्रामधील तक्त्यानुसार माहिती संहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग यांना सादर करावी व एक प्रत 'विशेष कक्षास' सादर करावी.

परिपत्रकासोबत उपरोक्त संहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग यांचे पत्र विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यानुसार कार्यवाही करावी.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र, इत्यादी महाविद्यालये (अल्पसंख्याक महाविद्यालयासह) आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक, रत्नागिरी उपकेंद्र व ठाणे उपकेंद्र.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई
एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई- ४०० ००१.
e-mail :-jd@jdhemumbai.gov.in. :- jdhemumbaischolarship@gmail.com.
Web :- jdhemumbai.maharashtra.gov.in
फोन & फॅक्स :- ०२२-२२६५६६००.

क्र. सहसं/उशि/मुंवि/२०१८-१९/ 2984 दिनांक :- 30-08-2018

**अतितात्काळ**

प्रति,

1. कुलसचिव,
   मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-400 032.
2. कुलसचिव,
   एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ,
   चर्चगेट, मुंबई- 400 020.
3. सर्व शासकीय व अशासकीय, अनुदानित,
   विना अनुदानित, कायम विनाअनुदानित,
   महाविद्यालये.

**विषय :- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या वेगवेगळया शिष्यवृत्ती योजनेबाबत.**

**संदर्भ :-** 1.**शासन निर्णय क्र.संकीर्ण-2017/प्र.क्र.332/तांशि-4,दि.07/10/2017.**
2.**शासन निर्णय क्र.संकीर्ण-2017/प्र.क्र.332 भाग-3/तांशि-4,दि.07/08/2018.**
3.**संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/शिष्य-2018/ईबीसी/9085,दि.13/8/2018.**
4. **या कार्यालयाचे पत्र क्र.सहस/उशि/मुंवि/2018-19/1690,दि.05/7/2018.**
5.**दि.26/7/2018 रोजी मुंबई विद्यापीठ येथे या विभागातील प्राचार्य यांच्या सभेमध्ये दिलेले पत्र.**
6.**दि.23/8/2018 रोजी मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांनी दिलेले निर्देश.**

या पत्रान्वये आपणांस सूचित करण्यात येते की, आपल्या विभागामध्ये उच्च शिक्षण, संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या विविध शिष्यवृत्तीबाबत आपणास वेळोवेळी अवगत करण्यात आलेले आहे. शासन निर्णय तसेच संचालनालयाचे निर्देश, परिपत्रकाद्वारे तसेच शिष्यवृत्तीबाबत झालेल्या सभेमध्ये आपणांस कळविण्यात आलेले आहे.

शिष्यवृत्ती पात्रताधारक विद्यार्थी ते शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नयेत, तसेच त्यांना येणा-या अडचणी व शंकेचे प्रत्येक स्तरावर निराकरण करण्याबाबत सूचना देण्यात आलेले आहेत. याबाबत येणा-या अडचणीचे निराकरण करण्यासाठी सहसंचालक कार्यालय, मुंबई तसेच मुंबई विद्यापीठ याठिकाणी नोडल ऑफिसरची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

दि. 26/7/2018 रोजी मुंबई विद्यापीठ येथे शिष्यवृत्तीची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये मुंबई तसेच पनवेल विभागातील एकूण 122 प्राचार्य तसेच त्यांचे प्रतिनिधी यांना शिष्यवृत्तीबाबत माहिती व सूचना देण्यात आल्या आहेत.

दि.23/7/2018 रोजी झालेल्या सभेमध्ये मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांनी मुंबई विभागामध्ये मागील वर्षी शिष्यवृत्ती लाभधारक विद्यार्थी संख्या फार कमी असल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली, तसेच यावर्षी शिष्यवृत्ती लाभधारक विद्यार्थी संख्या जास्तीत जास्त वाढविण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती लाभधारक विद्यार्थी संख्या जास्तीत जास्त वाढविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत.

सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.

**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई
एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई- ४०० ००१.
e-mail :-jd@jdhemumbai.gov.in. :- jdhemumbaischolarship@gmail.com.

Web :- jdhemumbai.maharashtra.gov.in फोन & फॅक्स :- ०२२-२२६५६६००.

क्र. सहसं/उशि/मुंवि/२०१८-१९/ 2986 दिनांक :- 30-08-2018

**अतितात्काळ**

प्रति,

1. कुलसचिव,
   मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-400 032.
2. कुलसचिव,
   एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ,
   चर्चगेट, मुंबई- 400 020.
3. सर्व शासकीय व अशासकीय, अनुदानित,
   विना अनुदानित, कायम विनाअनुदानित,
   महाविद्यालये.

**विषय :- राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून सूचित करण्यात येते की, उच्च शिक्षण विभागामार्फत राबविल्या जाणा-या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतीपूर्ती योजना व डा. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना आणि अन्य तत्सम शिष्यवृत्ती योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच पात्र लाभार्थीपर्यंत योजनेचा लाभ पोहोचविण्याचा दृष्टीने सहाय्यक/पूरक यंत्रण उभारणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने महाविद्यालय/ विद्यापीठे स्तरावर तातडीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1.**शिष्यवृत्ती समुपदेशन कक्ष-**

प्रत्येक महाविद्यालय तसेच विद्यापीठ स्तरावर प्राध्यापकांच्या सहकार्याने त्रिसदस्यीय शिष्यवृत्ती समुपदेशन कक्षाची स्थापना करावी. त्यापैकी एक महिला सदस्य असाव्यात. महाविद्यातील विद्यार्थ्यांना कोणकोणत्या शिष्यवृत्तीच्या लाभ मिळू शकतो, त्या शिष्यवृत्तीचे स्वरुप व अनुषंगिक बाबींसंदर्भात विद्यार्थ्यांना उदबोधन करणे व त्यांच्या अडचणींचे निराकरण करण्याचे कार्य प्रस्तुत शिष्यवृत्ती समुपदेशन कक्ष करेल.

सदर समुपदेशन कक्ष हे महाविद्यालयाच्या नियमित वेळेपूर्वी अर्धा तास व महाविद्यालयाच्या वेळेनंतर अर्धा तास सुरू राहील. शक्य झाल्यास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यासाठी एकदिवसीय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करावे.

2.**शिष्यवृत्ती सुविधा केंद्र-**

प्रत्येक महाविद्यालयाने शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी स्वतंत्र संगणक कक्ष उभारावा व शिष्यवृत्ती सुविधा केंद्रात ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता संगणक सुविधा विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

- अर्ज हे स्वत: विद्यार्थ्यांनीच भरावयाचे आहेत.
- महाविद्यालयाने त्याकरीता विद्यार्थ्यांकडून कुठलेही शुल्क आकारु नये.

3. **सूचना फलक-**

- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनांची माहिती दर्शवणारा फलक 3X5 फुट (बॅनर) या आकारात महाविद्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात यावा.(सोबत नमूना जोडला आहे.)
- दि.27/6/2018 च्या पत्रान्वये आपण सर्व महाविद्यालयांना दि.07/10/2017 च्या शासन निर्णयानुसार राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यासाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच काही नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करुण्यात आला आहे. सदर शासन निर्णशनुसार आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जातो.
- दि.31/03/2018 च्या शासन निर्णयानुसार सन 2018-19 पासून उत्पन्नाची मर्यादा रु.6.00 लाख वरुन रु.8.00 लाख करण्यात आली आहे.
- दि.07/10/2017 च्या शासन निर्णयामधील मुद्या क्र. 42 अन्वये सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्यास अनुज्ञेय असणा-या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीच्‍ी रक्कम ही संबंधित विद्यार्थ्याकडून प्रवेशाच्या वेळी आगाऊ स्वरुपात घेऊ नये व विद्यार्थ्याची पिवळणूक होणार नाही याची योग्य ती खात्री शैक्षणिक संस्था करेल. तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास डीबीटीद्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालयास शुल्कापोटी तात्काळ अदा करावी व याची सर्व जबाबादारी ही संबंधित विद्यार्थ्यांची असेल.

तसेच दि. 05/07/2018 च्या पत्रान्वये देखील आपण सर्व महाविद्यालयांना याबाबत पुनश्च कळविले आहे.
उच्च शिक्षण विभागामार्फत देण्यात येणा-या अकरा शिष्यवृत्तींची माहिती फलकावर सूचना लावण्यात यावी.(सोबत संक्षिप्त माहिती जोडली आहे.)

वरील बाबींची तात्काळ अंमलबजावणी करुन तसा पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच पुढील सन 2018-19 च्या नियोजनाच्या दृष्टीने आजरोजीची सद्य:स्थिती विचारात घेऊन महाविद्यालयाच्या एकूण(अनुदानित/विना-अनुदानित/कायम विना-अनुदानित) विद्यार्थ्यांची माहिती पुढील तक्तात सादर करावी.
सन 2018-19 या शैक्षणिक वर्षाकरीता आजरोजीचा सद्य:स्थितीतील प्रवेशित एकुण विद्यार्थी (अनुदानित/विना-अनुदानित/कायम-विना अनुदानित) विद्यार्थ्यांची माहिती पुढील तक्त्यात सादर करावी.

सन 2018-19 या शैक्षणिक वर्षाकरीता आजरोजीची सद्य:स्थितीतील प्रवेशित एकूण विद्यार्थी (अनुदानित/विना-अनुदानित/कायम-विना अनुदानित) विद्यार्थ्यांची माहिती.

| खुल्या प्रवर्गातील प्रवेशित विद्यार्थी संख्या | | | |
|---|---|---|---|
| उत्पन्न 1 लाखापेक्षा कमी | उत्पन्न 1 लाख ते 8 लाख मधील | उत्पन्न 8 लाखापेक्षा जास्त | एकूण |
| | | | |
| | | | |
| | | | |

सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.

सोबत-

- योजनांची माहिती दर्शक बॅनरचे प्रारुप.
- उच्च शिक्षण विभागामार्फत राबविल्या जाणा-या अकरा शिष्यवृत्तीच्या संक्षिप्त माहितीचा तक्ता.
- शिष्यवृत्ती संदर्भातील महत्वाचे शासन निर्णय.

### उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनाच्या शिष्यवृत्ती रक्कमेबाबतची माहिती.

| अ.क्र. | योजनेचे नांव | शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|
| १ | एकलव्य आर्थिक सहाय्य | ५०००/- रु. |
| २ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य | १. प्रवेश शुल्क - १०० टक्के<br>२. सत्र शुल्क - १०० टक्के<br>३. भोजन शुल्क - १५० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता = १५०० रु.<br>४. वैद्यकीय खर्च - विद्यार्थ्यांचा झालेला खर्च किंवा रु. १२० यापैकी जी रक्कम जास्त असेल अशी रक्कम.<br>५. परीक्षा शुल्क - १०० टक्के<br>६. शिक्षण शुल्क - १०० टक्के<br>७. ग्रंथालय शुल्क - १०० टक्के<br>८. पुस्तके व इतर स्टेशनरी साहित्य -<br>a) ११ वी, १२ वी - ३०० रु. वार्षिक<br>b) पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम (science, veternary and agriculture अभ्यासक्रम वगळून) - ५०० रु. वार्षिक<br>c) पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम (science, veternary and agriculture अभ्यासक्रमासाठी) - ७०० रु. वार्षिक<br>d) वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रम - १००० रु. वार्षिक<br>e) पदवीका अभ्यासक्रम - ५०० रु. वार्षिक<br>९. वसतीगृह शुल्क - ६०० रु. वार्षिक<br>१०. प्रयोगशाळा शुल्क - १०० टक्के<br>११. जिमखाना शुल्क - १०० टक्के |
| ३ | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती | २५० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता २५०० रु. |
| ४ | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती | ७५० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता ७५०० रु . तसेच १००० रु. वार्षिक सादिलवार खर्च असे एकूण ८५०० रु. वार्षिक |
| ५ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती | ८००० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता ८०,००० रु. तसेच १०,००० रु. वार्षिक सादिलवार खर्च असे एकूण ९०,००० रु. |
| ६ | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | १०० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता १००० रु. |
| ७ | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती | १०० रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता १००० रु. |
| ८ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती | ११ वी १२ वी - १०० रु. प्रमाणे दहा महिन्याकरिता - १००० रु.<br>पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम - १५० रु. प्रमाणे दहा महिन्याकरिता -१५०० रु. |
| ०९ | राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग -२) | प्रत्यक्ष शिक्षण शुल्क किंवा रु. ५००० यापैकी जी रक्कम कमी असेल अशी रक्कम. सदर शिष्यवृत्तीची रक्कम संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून संबंधित विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येते. |
| १० | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | १. प्रवेश शुल्क - १०० टक्के<br>२. सत्र शुल्क - १०० टक्के<br>३. ग्रंथालय शुल्क -१०० टक्के<br>४. प्रयोगशाळा शुल्क - १०० टकके<br>५. शिक्षण शुल्क - लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची रक्कम महाविद्यालयांकडून आकारली जात नाही. तसेच संबंधित महाविद्यालयास सदरची रक्कम देण्यात येत नाही. (सदर शिष्यवृत्तीसाठी केवळ शासकीय, अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थीच पात्र आहेत.) |

| | | |
|---|---|---|
| ११ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना | सदर योजनेसाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता खालील प्रमाणे लाभ देय आहेत. |

१. **शिक्षण शुल्क :-**

| उत्पन्न मर्यादा | शुल्क प्रकार | अभ्यासक्रम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | शासकीय | अशासकीय अनुदानित | अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानित - विनाअनुदानित) | कायम विनाअनुदानित |
| व्यावसायीक अभ्यासक्रम | | | | | |
| रु. २.५० लाख पर्यंत | शिक्षण शुल्क | १०० % | १०० % | ५० % | ५० % |
| रु. २.५० लाख ते रु. ८ लाखापर्यंत | शिक्षण शुल्क | ५० % | ५० % | ५० % | ५० % |
| बिगर व्यावसायीक अभ्यासक्रम | | | | | |
| रु. ८ लाखापर्यंत | शिक्षण शुल्क | १०० % | १०० % | १०० | १०० |

२. **परीक्षा शुल्क :-**

| | |
|---|---|
| व्यावसायीक अभ्यासक्रम | शासन नियमानुसार आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या ५० टक्के |
| बिगरव्यावसायीक अभ्यासक्रम | शासन नियमानुसार आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या १०० टक्के |

३. **निर्वाह भत्ता** :- ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. १.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांसाठी.

| उत्पन्न मर्यादा | अभ्यासक्रम | शैक्षणिक वर्षातील दहा महिन्याकरीता अनुज्ञेय निर्वाह भत्ता |
|---|---|---|
| रु. १.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी | व्यावसायीक अभ्यासक्रम (अल्पभूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूरांचे पाल्य वगळून) | रु. ३०००/- |
| | बिगरव्यावसायीक अभ्यासक्रम | रु. २०००/- |